# Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Syllabus prescribed under Choice based Credit System 2023-24

Faculty : Humanities

# Programme : RASHTRASANT TUKDOJI THOUGHT

Part A

POS :-

1) राष्ट्रसंतांच्या विचारविश्वाची ओळख शब्द माध्यमातून पटवणे.

2) गायन कलेद्वारा तथा वाद्यांच्याद्वारा राष्ट्रसंतांच्या भावविश्वाची समृद्धी अनुभवणे.

3) परमार्थदृष्टया मानवामानवांमध्ये समतेचा प्रकाश पाडून एकता अनुभवणे.

4) भाषाभगिनीच्या वेगळेपणातही संगीताच्या भाषेत समुहाशी सहज संवाद साधणे.

## Employability Potential of the Programme

* भजन व भाषणांद्वारे लोकभावनेत मानवता जागवणारे उद्बोधन तसेच कीर्तन प्रवचनाद्वारे परंपरेतील पवित्र विचार श्रोत्यापर्यंत पोहोचविणे, यासाठी कृतार्थबुद्धीने मानधन सहजगत्या प्राप्त होऊ शकते.

* साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये जनजीवनाशी संबंधित कथा, कविता, लेख, नाटक, लोकरंजनात्मक साहित्य निर्माण करून अर्थार्जन सहन होऊ शकते.

* सामुहिक संघटनाद्वारे लोकरंजन व उद्बोधन साधणारे आणि संतविचारांचा प्रसार करणारे गोंधळ, भारूड, पोवाडे इत्यादी लोककलाप्रकार आयोजित करून अर्थप्राप्ती सहज होऊ शकते.

# राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा (ऐच्छिक विषय)

## सेमिस्टर V

एकूण गुण २० अंतर्गत मुल्यानापन २०

## ग्रामगीता स्वरूप दर्शन (अभ्यासक्रम)

एकक १

भारतीय ग्राम : बदलते स्वरूप

ग्रामव्यवस्था - स्वातंत्र्यापूर्वी, स्वराज्य प्राप्तीनंतर, आधुनिक शहरीकरणाच्या लाटेत गावाची दुरवस्था कृषी, ग्रामोद्योग स्वच्छता व आरोग्य यांची परवड. भूमी, जल, वन व ऊर्जा यांच्या नियोजनाअभावी ग्रामीणांचे जीवन दुःसह.

भारतीय ग्रामीण जनतेत बोकाळलेली बेकारी बेदिली व नैराश्य यामुळे वर्तमान ग्रामजीवनात मूलभूत परिवर्तनाची नितांत आवश्यकता. ग्रामसुधारणेच्या चळवळी यांचे नेतृत्व.

## एकक-२

कृषिसुधार व ग्रामोद्योगांना चालना

भारतीय कृषी-परंपरा व आधुनिक कृषी तंत्र राष्ट्रसंतांची समन्वयकारी देशीय भूमिका. बी-बियाणे खते व कृषी सुधारणा यांच्याबाबत प्रयोगशीलतेची निकड. कच्चा कृषिमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्याची गरज. स्व विकासाकरिता आधुनिक तंत्रे व आवश्यक ती कौशल्ये यांचा विकास करण्याची निकड. सहकारी भांडारे, सक्षम विपणन व्यवस्था व बाजारपेठा उभारण्याविना तरणोपाय नाही.

राष्ट्रसंतांच्या मते कृषिविषयक व अन्यही संशोधन कार्यास ग्रामांच्या स्वावलंबित्वाधी मर्यादा भूमी-जल-उर्जा नियोजनाची अंमलबजावणी ग्राम अगर ग्रामसमूह पातळीवर होणे आवश्यक. कृषिपूरक ग्रामोद्योगांची उभारणी ही ग्रामपातळीवर. ग्राम या ग्रामसमूह पातळीवर शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचीही उभारणी होणे निकडीचे. विपणन व्यवस्थेचे सामूहिक सहकारी व्यवस्थापनामार्फत सक्षमीकरण.

## एकक-३

## स्वच्छता व ग्राम-आरोग्य

गाव व परिसराची स्वच्छता व ग्रामीणांचे आरोग्य हे परस्पर संबंध. घराघरातील सांडपाणी व मलमूत्राने परसबागा फुलवणे कंपोष्ट खताकरिता गावाबाहेर शोष खड्डे पुरवणे. घर परिसर रस्ते विहिरी व नाल्या स्वच्छ राखणे ही गावक-यांची जबाबदारी गाव-प्रदक्षिणेद्वारा गावाची वरचेवर स्वच्छता.

ग्रामीणांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी सात्विक जीवनशैली सामूहिक बलसंवर्धनात आरोग्यमंदिरापेक्षा उत्पादक व्यायाम अधिक महत्वाचे श्रम-प्रतिष्ठा हे उद्योगमूल्य तसेच आरोग्यमूल्यही त्याद्वारे साधन-संपत्तीचीही निर्मिती श्रमप्रतिष्ठेला आधुनिक कृषी व पुरक उद्योगांच्या उपकरणांची जोड संपत्ती व आरोग्य दोहोंना उपकारक सात्विक आहार व सुलभ ऊर्जा प्राप्तीसाठी गोवंश सुधारणा स्वच्छता व गोरक्षण सेवा लोकसंत गाडगेबाबांचे कार्य.

## एकक ४

## ग्रामसुरक्षा व महिलोन्नती

गावातील साधन-सामुग्री, कृषी उत्पादने तथा विविध वस्तुभांडारे यांचे नैसर्गिक तथा मानवनिर्मित आपत्तीमध्ये रक्षण. गावातील तरूणांचे सेवातत्पर ग्रामरक्षक दल. गावातील असामाजिक तत्वे, व्यसनाधीन व्यक्ती तथा तामसी मदान्ध यांना वठणीवर आणण्याचे सामर्थ्य ग्रामरक्षक दल सदस्यांचे ठायी. निरामय जीवनक्रम निसर्गोपचार, व्यसनमुक्ती, स्वावलंबन, सेवाभाव व दक्षता यांचे महत्व.

स्त्रियांच्या संबंधातील रूढ सामाजिक तथा सांस्कृतिक परंपरा, स्त्रीमुक्तीबाबत तज्ञांचा दृष्टिकोन. काही भारतीय व पाश्चात्य विचारकांच्या तुलनेत राष्ट्रसंतांची महिलोन्नती विषयक भूमिका श्रीचक्रधर, मध्ययुगीन संत, स्वामी विवेकानंद, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे, मेरी वुलस्टोन क्राफ्ट, सीमों द बोव्हा, व्हर्जिनिया वुल्फ, बेटी फ्रायडन, केट मिलेट, बार्बरा स्मीथ.

## एकक-५

## जीवन शिक्षण :

शिक्षणासंबंधी तज्ञांचा दृष्टीकोन. काही पाश्चात्य व भारतीय शिक्षणशास्त्रज्ञ प्लेटो, रुसो, जॉन ड्युई. फ्रेडरिक फ्रॉबेल, महात्मा फुले, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ए.पी.जे अब्दुल कलाम, राष्ट्रसंतांची शिक्षणविषयक भूमिका जीवन जगण्यास आधारभूत ठरणारे व जीवनश्रेय प्राप्त करून देणारे शिक्षण नुसते पुस्तकी ज्ञान नव्हे, तर जीवन-संघर्षात संकटे व अन्याय यांचा मुकाबला करण्यास सक्षम बनविणारे शिक्षण, शिक्षणाने छात्राचा शारीरिक-मानसिक, आत्मिक विकास.

औपचारिक शिक्षनासोबत औद्योगिक, व्यावसायिक व माणुसधर्मी अशा संशोधनाला मार्ग दाखविणारे शिक्षण. सहकारभावना छात्रांत रुजविणारे सक्रिय उपक्रम हेच शिक्षणाचे मुख्य सूत्र.,

शिक्षणाचे प्रमुख घटक : माता, शिक्षक आणि समाज. त्यातही मातेचे स्थान सर्वश्रेष्ठ.

## संदर्भ ग्रंथ


1. Rural Development -Prasad B. K. Sarup & Sons publ. New Delhi.

२. ग्रामीण भारताच्या समस्या प्रकाशन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

३. ग्राम विकास प्रकाशन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

४. ग्रामीण समाजशास्त्र प्रा. पी. एम. खरे, एका गया प्रसाद अॅन्ड सन्स गया

५ जनक्रांतीची दिशा -ले. डॉ. सुभाष सावरकर, प्रका...परिषद अमरावती

६. जीवनयोगी खंड ७ से ११ सुदाम सावरकर, साहित्याप्रमा प्रकाशन, अमरावती

सखोल अभ्यासाकरिता राष्ट्रसंत साहित्य

७. ग्रामगीता -ले राष्ट्रसंत तुकडोजी, प्रका, श्रीगुरुदेव गुरुकुंज अमरावती


@@@@@@@@@@@@@@@@@@

## राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा (ऐच्छिक विषय)

सेमिस्टर VI

एकून गुण ८० अंतर्गत मूल्यामापन २०

## ग्रामगीतेचे क्रांतदर्शी तत्वचिंतन (अभ्यासक्रम)

### एकक-१

### संतांचा भागवत धर्म व राष्ट्रसंतांचे तत्वचिंतन:

ज्ञानोत्तर भक्तीच्या प्रभावाने अध्यात्मनिष्ठ वृत्तीतून समाजोन्मुख प्रवृत्तीचे पोषण

(१) संत ज्ञानेश्वर (२) संत नामदेव (३) संत एकनाथ (४) संत तुकाराम व (५) संत रामदास या मध्ययुगीन संतांच्या तत्वज्ञानाशी राष्ट्रसंत तुकडोजीच्या ग्रामगीतेतील 'देवदर्शन "देव-देवळे' व 'मूर्ती उपासना' अध्यायामधील तत्वदृष्टीची समानता व वेगळेपणा.

### एकक-२

## ग्रामगीतेतील धर्मचिंतनाचे नवे उन्मेष

धार्मिक क्षेत्रातील पारंपरिक परिभाषा न वापरता आध्यात्मिक विकासाचा आलेख स्पष्ट करणाऱ्या "आत्मानुभव' या अध्यायात ग्रामगीताकारांनी विवेचिलेली आध्यात्मिक भूमिका धर्मपरंपरेने दिलेले रूढ अर्थ बाजूला सारून विज्ञानदृष्टी व स्वानुभव यांच्या बळावर स्पष्ट केलेले खालील व्याख्या व संकल्पनांचे काळसुसंगत अर्थ (१) धर्म व धार्मिक (२) देव (३) पूजा (४) अवतार (५) संतमहिमा (६) भक्त व भक्ती (७) पाप-पुण्य (८) नामस्मरण व नामभक्ती (९) आस्तिक/ नास्तिक.

### एकक-३

## ग्रामगीतेतील समाजर्वितनाची मूलग्राही दृष्टी

आध्यात्मातून प्राप्त झालेली आत्मशक्ती व विज्ञानाद्वारे प्राप्त झालेली विवेकशक्ती यांच्या संयोगातून विश्वाची मूल पेशी 'जीव' नसून 'ग्राम' हीच आहे हा कांतदर्शी निर्णय. ग्रामगीता लेखनाचा पाया पुढील बाबीच्या निर्णयातुन स्पष्ट होणारे राष्ट्रसतांचे मूलग्रही समाजचिंतन (१) चार आश्रम (२) चातुर्वर्ण्यव्यवस्था (३) जातिव्यवस्था (४) गुणश्रेष्ठतेनुसार ब्राम्हाणत्व (५) समाजगटांच्या समानतेचा विचार (६) विविध धर्मसंस्कार (७) स्त्री-समानता व श्रेष्ठता विचार (८) सद्धर्म-प्रचारकाचे सर्वोच्च स्थान

## एकक-४

## ग्रामगीता तत्वदर्शन: ग्रामधर्म ते विश्वधर्म

ग्रामगीतेची 'अर्पण-पत्रिका' ग्रामनाथाविषयी कृतज्ञता ग्रामगीतेची फलश्रुती 'ग्रंथ-महिमा' (अध्याय क्र. ४१) ग्रामगीतोक्त तत्वचरणाने सृष्टशक्तींकडून प्रसादप्राप्तीचे आश्वासन ग्रामगीता लेखनाचे उद्दिष्ट व उदिष्टमूर्ती ग्रामधर्मातून विश्वधर्माकडे.

ग्रामगीतेचे तत्वदशी अध्याय (१) 'देव-दर्शन' (२) 'देव-देवळे' व 'मूर्ति-उपासना' (३) 'ग्रामनिर्माण कला' व 'जीवन-कला' (४) 'सामुदायिक प्रार्थना' व 'प्रार्थना व विश्वधर्म' (५) 'दलित-सेवा (६) 'संत-चमत्कार' व 'संत स्वरूप' (७) 'अवतार कार्य' (८) 'प्रारब्धवाद' व 'प्रयत्न-प्रभाव' (९) 'आत्मानुभव' (१०) 'ग्रामकुटुंब' व 'भू-वैकुण्ठ' वरील अध्यायांच्या अभ्यासातून उपलब्ध होणारे तत्वचिंतन अध्यात्म आणि विज्ञान यांचा संयोग व समन्वय.

## एकक-५

## ग्रामगीता श्रेष्ठ जनसाहित्यकृती

जनसाहित्य-व्याख्या, अन्य साहित्यधारांपासून वेगळेपण लेखक, लेखनकृती व वाचक या तिन्ही दृष्टींनी जननिष्ठ असणे हे लक्षण. जनसमीक्षापद्धती निर्मिती, स्वरूप, आस्वाद, जाणीव-प्रवर्तकता व जनसंस्कृतीचे संरक्षण-संवर्धन.

वरील समीक्षापद्धतीच्या अनुरोधाने 'ग्रामगीता' ग्रंथाची समीक्षा.

समीक्षा निर्मितिप्रक्रिया आवाहन/संबोधन/प्रेरणा/ प्रयोजन / जननिष्ठ.

वाचकाचा अनुभव-खोली/व्याप्ती/घनता/जाणीव-परिवर्तन क्षमता व जननिष्ठ.

जनसंस्कृति-सापेक्षता-जनसंस्कृतीचे संरक्षण/ संवर्धन करणारे श्रेष्ठ ग्रंथ हे अक्षर वाङ्मय ग्रामगीतेचे जनसाहित्यमूल्य. ग्रामगीता हे जनसाहित्याचे आधुनिक प्रमाणक.

## संदर्भ ग्रंथ


१. जनसाहित्याचे आधारस्तंभ — सुदाम सावरकर, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती

२. संत ज्ञानेश्वर ते राष्ट्रसंत तुकडोजी — डॉ सुनंदा खेरडे, प्रज्ञा प्रकाशन, पुणे

३. संतवाङ्मयाचे जनसाहित्यमूल्य — डॉ सुभाष सावरकर, प्रका म.ज.सा. परिषद, अमरावती

४. जनसाहित्याची चळवळ वाद-संवाद — डॉ सुभाष सावरकर, प्रका म.ज.सा. परिषद, अमरावती.

५. ग्रामगीतेची निर्मितिप्रक्रिया — डॉ. योगिता पिंजरकर, प्रका. म.ज.सा परिषद, अमरावती.


## सखोल अभ्यासाकरिता राष्ट्रसंत वांड.मय


६. ग्रामगीता — ले राष्ट्रसंत तुकडोजी संपा सुदाम सावरकर, प्रका श्रीगुरुदेव सेवामंडळ गुरुकुंज आश्रम